

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,

**महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**

मालेगाव कॅम्प जि. नाशिक

नॅक पुनर्मूल्यांकित 'A+' दर्जा प्राप्त महाविद्यालय

**मध्यवर्ती ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,**

# " वाचन संकल्प महाराष्ट्राचा " उपक्रमांतर्गत ग्रंथ दिंडी आणि व्याख्यान

**कार्यक्रम अहवाल**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालय, सार्वजनिक ग्रंथालय यांच्या माध्यमातून विद्यार्थी / विद्यार्थिनी यांच्यामध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा अभिनव उपक्रम दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान वाचन पंधरवडा म्हणून राबविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत महाराजा सयाजीराव गायकवाड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय मालेगाव येथील मध्यवर्ती ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. सुभाष निकम यांच्या मार्गदर्शनाखाली वाचन संस्कृती जोपासण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक हिवाळी शिबिरात मौजे लेंडाणे ता. मालेगाव येथे सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी **ग्रंथ दिंडी आणि व्याख्यानाचे आयोजन दिनांक ०९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी दहा वाजता** करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मालेगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक श्री. तुषार भदाणे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. टी एस सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.प्रविण पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. ए जी नेरकर, डॉ. जी जे भामरे, प्रा.कंनोर, डॉ. किशोर निकम, डॉ.अरुण पाटील, ग्रंथपाल श्री. निलेश नागरे, प्रा. अशोक वाघचौरे, प्रा. ए.डी.बाविस्कर, डॉ.सौ.सोनवणे, प्रा.अहिरे, व ग्रंथालय कर्मचारी श्री.स्वप्नील वाघ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. ए जी नेरकर यांनी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमाची आणि मौजे लेंडाणे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गेल्या चार दिवसापासून पार पाडलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच या उपक्रमांतर्गत व्याख्यानासाठी उपस्थित मालेगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक श्री. तुषार भदाणे यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनपर मनोगतात श्री. तुषार भदाणे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहण्याचे तसेच ती स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी योग्य ते नियोजन आणि कृती करण्याचे आवाहन केले. मोठी स्वप्न बघण्यासाठी आपल्याला कठोर मेहनत घ्यावी लागेल आणि तेव्हाच आपण बदलत्या सामाजिक जीवनात यशस्वी होऊ शकतो असे संगितले. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना काय नियोजन केल्याने विद्यार्थी यशस्वी होऊ शकता याची माहिती त्यांनी दिली. महाविद्यालयात असताना वाचलेल्या पुस्तकांमुळे अनेकांचे आयुष्य घडल्याचे अनेक उदाहरणे त्यांनी दिली. त्यामुळे जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा वाचन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच श्री. भदाणे यांनी विद्यार्थीदशेत मोबाइलच्या चुकीच्या वापरामुळे मुलामुलींचे आयुष्यं कशी बरबाद होत आहे हे सविस्तरपणे संगितले. त्यामुळे सायबर गुन्हे घडू नये म्हणून प्रत्येकाने काय काय खबरदारी घेतली पाहिजे याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अनिल सावळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांद्वारे मौजे लेंडाणे येथे गेल्या चार दिवसापासून आयोजित विविध उपक्रमांचे कौतुक करत अशा उपक्रमात सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध होते ज्याचा फायदा विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी करून घ्यावा असे संगितले. अशा उपक्रमात सहभागी होत असताना ग्रंथालयात जावून पुस्तक हातात घेऊन वाचनाचा आनंदही विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन यावेळी केले. कार्यक्रमास

उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.अशोक वाघचौरे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी कु. कावेरी निकम यांनी केले यावेळी मोठ्या प्रमाणात मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.



